**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुहास चिमाजी विटे
प्लॅट नं.१(बी-२), हर्षल रेसिडेन्सी, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, वडगाव, ता.मावळ, जि.पुणे    उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, वडगाव, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०४+६२६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, वडगाव, ता.मावळ, जि.पुणे श्री.पी.डी.खोपकर

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, वडगाव, ता.मावळ, जि.पुणे श्री.एच.व्ही.रोकडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.११.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>सर्व शिक्षा अभियानांतर्गत संबंधित कालावधीतील रोजकीर्द(कॅशबुक) प्रत्येक पानाच्या प्रमाणित नकला. या कालावधीतील खर्च केलेल्या रकमांची व्हाऊचर्स, पावत्या यांच्या क्रमान्वये प्रमाणित प्रती. शासनाकडून प्राप्त झालेली, पंचायत समितीकडून खर्च व शिल्लक राहिलेल्या रकमेचा तपशील. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,वडगाव मावळ यांनी माहिती दिलेली नसल्यामुळे शास्ती करावी,अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुहास चिमाजी विटे यांनी आयोगाकडील अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

श्री.विटे हे जिल्हा परिषदेत उपशिक्षक होते. त्यांच्या गैरवर्तनाबद्दल त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले होते. खातेनिहाय चौकशीनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी त्यांना सेवेतून बडतर्फ केले आहे. त्यामुळे प्रशासनाला त्रास देण्यासाठी विविध प्रकारचे अर्ज व पत्रव्यवहार ते करीत असतात, असे लेखी व तोंडी प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.बी.जी.कड यांनी केले. माहितीसाठी शुल्क भरण्याबाबत विहित मुदतीत दोनदा त्यांना कळविण्यात आले. ते दारिद्र्यरेषेखालील नाहीत व त्यांनी शुल्क भरलेले नाही.त्यामुळे माहिती दिलेली नाही. शुल्क भरल्यास त्या दिवशीच त्यांना माहिती दिली जाईल, असे प्रतिपादन श्री.कड यांनी केले.

शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याबाबतचा निर्णय देऊन तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.पी.डी.खोपकर यांनी नमूद केले. श्री.विटे यांना पत्रे पाठविल्याची नोंद असलेली जावक

बारनिशीतील पानाची छायांकित प्रत आयोगाला सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने दि.११.६.२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.कड यांनी दि.१८.६.२००८ च्या पत्रान्वये जावक बारनिशीतील नोंदीची छायांकित प्रत सादर केली. शुल्क न भरता माहिती न मिळाल्याची तक्रार व त्यासाठी आयोगाकडे अपील करण्याची अपीलकर्ता श्री.सुहास चिमाजी विटे यांची कृती योग्य नाही.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.हरिश्चंद्र म्हाळू वाघ
सर्वे न.१०, कामराजनगर, शिवराज चौक, येरवडा, पुणे-६ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप शिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०६५/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०१.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हरिश्चंद्र म्हाळू वाघ
सर्वे न.१०, कामराजनगर, शिवराज चौक, येरवडा, पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी तथा** उप शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,<br>कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.१०.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.१०.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१९.१२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.०२.२००९ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१.१०.२००९ रोजी घेण्यात आली.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीकरिता मागासवर्गीय विद्यार्थिनींबाबतची माहिती आपल्याला आठ महिन्यानंतर दिली गेली. तीही चुकीची व विसंगत दिली. पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाने जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाला व शाळांना या शिष्यवृत्तीबाबत कळवून प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवावयास पाठविले नाहीत, त्यामुळे मागासवर्गीय मुली सन २००४ पासून दोन कोटी रूपयांहून जास्त रकमेच्या शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत. त्याला शिक्षण मंडळच जबाबदार आहे. या शिष्यवृत्तीबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती वारंवार मुदत मागूनही शिक्षण मंडळाने परिपूर्ण दिली नाही, म्हणून दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.हरिश्चंद्र म्हाळू वाघ यांनी केली.

श्री.वाघ यांनी दि.१८.१०.२००८ रोजी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीच्या संदर्भात दोन अर्ज केले होते. त्यावेळी दिवाळीची सुट्टी लागत असल्यामुळे दिवाळीची सुट्टी संपल्यानंतर शाळांकडून माहिती घेऊन देण्यात येईल, असे उत्तर त्यांना पाठविले. लोकनेते यशवंतराव चव्हाण विद्यानिकेतन, शाळा क्र.६ येरवडा, पुणे या शाळेत शिकणाऱ्या आपल्या दोन मुलींना सन २००४ - पासून शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत त्यांचा अर्ज होता. शिक्षण मंडळाने परिपत्रक दिलेले नसल्यामुळे शिष्यवृत्ती दिली जात नसल्याचे शाळेने आपल्याला सांगितले, असे त्यांनी अर्जात म्हटले होते. पहिल्या अर्जातील मुद्दयांसह सन २००४-०५ ते २००८-०९ या काळातील शिक्षण मंडळाच्या अंतर्गत शाळांबाबतची माहिती दुसऱ्या अर्जात मागितली होती. श्री.वाघ यांच्या मुलीच्या शाळेच्या पर्यवेक्षकांना बोलावून घेऊन त्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न मार्गी लावला. शिष्यवृत्तीच्या योजनेची कार्यवाही पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडून झालेली नाही. पुणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून ही कार्यवाही होत असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती घ्यावी, असे श्री.वाघ यांना कळविले. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीबाबतचे प्रस्ताव समाजकल्याण विभाग, पुणे यांच्यातर्फे शाळांकडून मागविले जातात व त्यानुसार त्या विभागातर्फे शिष्यवृत्तीला मंजुरी दिली जाते, हेही श्री.वाघ यांना स्पष्ट करण्यात आले होते. परंतु 'शाळा आपल्या कार्यकक्षेत असल्याने त्याची माहिती तुम्हीच घ्यावी,' अशा आशयाचे पत्र समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांनी पाठविले त्यामुळे महानगरपालिकेच्या सर्व शाळांकडून इयत्ता पाचवी ते सातवीच्या वर्गांबाबतची माहिती संकलित करून श्री.वाघ यांना देऊ केली. आधी देऊ केलेली माहिती व राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी देऊ केलेली माहिती श्री.वाघ यांनी स्वीकारली नाही. विशिष्ट नमुन्यातच माहिती मिळण्याचा आग्रह त्यांनी धरला व तो नमुना कार्यालयात येऊन देणार असल्याचे त्यांनी सागितले. त्यामुळे एक महिन्याची मुदत मागितली होती. त्याप्रमाणे माहिती दिली. शाळांची संख्या, तुकड्या यावरून विद्यार्थी संख्येबाबतचे अनुमान काढून माहितीत तफावत असल्याचे श्री.वाघ यांनी म्हटले आहे. परंतु शाळांकडून मिळालेल्या माहितीनुसार संख्या दिली आहे. काही लहान शाळा मोठ्या शाळांमध्ये

विलीन केल्यामुळे शाळांच्या संख्येत तफावत असल्याचेही त्यांना स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका श्री.धनंजय मनोहर परदेशी यांनी केले.

शिक्षण मंडळाचे तत्कालीन प्रमुख श्री.सुधाकर तांबे यांनी माहिती संकलित करून पूर्वी दिलेली आहे. शासन निर्णयाचे परिपत्रक शिक्षण मंडळाने महानगरपालिकेच्या सर्व शाळांना पाठविणे आवश्यक असल्याचे श्री.वाघ यांचे म्हणणे आहे. परंतु संबंधित योजना राबविण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण खात्याची आहे. तरीही योजनेचे महत्त्व लक्षात घेऊन दि.२५.३.२००९ रोजी सर्व शाळांना हे परिपत्रक शिक्षण मंडळाने पाठविले. तसेच या शिष्यवृत्तीपासून विद्यार्थिनी वंचित राहू नयेत यासाठी समन्वयाची जबाबदारी स्वतः होऊन स्वीकारून शाळांकडून जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव जाण्यासाठी प्रशासकीय कार्यवाही करण्याची पावले शिक्षण मंडळाने उचलली आहेत. माहिती देण्यास हेतुतः विलंब झालेला नसून प्रशासकीय कार्यवाहीसाठी प्रयत्न केले आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे श्री.रामचंद्र नामदेव जाधव यांनी केले. संबंधित शिष्यवृत्तीबाबतचा शासन निर्णय त्यांनी सादर केला. 'जिल्हा परिषदांमार्फत सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली या शिष्यवृत्तीचा खर्च करण्याची तरतूद त्यात आहे,' असे त्यांनी नमूद केले. मात्र शिक्षण मंडळाने हे प्रस्ताव पाठविण्यास शाळांना कळविणे आवश्यक असल्याचे व त्यांनी तसे न केल्यामुळे तीन-चार वर्षांतील शिष्यवृत्ती दिली न गेल्याचे प्रतिपादन श्री.वाघ यांनी केले. जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण खात्यामार्फत प्रस्ताव मंजूर करून शिष्यवृत्तीचे धनादेशही पाठविण्यात आले आहेत. पूर्वीच्या विद्यार्थिनींना राहिलेल्या वर्षांची शिष्यवृत्ती देण्यासाठी प्रस्ताव मागवून पुरवणी अनुदान मंजूर होण्यासाठी शिक्षण मंडळ प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.धनंजय मनोहर परदेशी व अपिलीय प्राधिकारी श्री.रामचंद्र नामदेव जाधव यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता, शिक्षण मंडळाने माहिती देण्यात हेतुतः विलंब केल्याचे दिसत नाही. तसेच योजना राबविण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या

समाजकल्याण खात्याची असल्यामुळे त्यासाठी शिक्षण मंडळाला जबाबदार धरता येणार नाही. शिक्षण मंडळाने योजनेच्या सुसूत्रतेसाठी समन्वयाची जबाबदारी घेऊन कार्यवाही केल्याचे जन माहिती अधिकारी श्री.धनंजय मनोहर परदेशी व अपिलीय प्राधिकारी श्री.रामचंद्र नामदेव जाधव यांचे निवेदन या अनुषंगाने लक्षात घेणे आवश्यक आहे. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने शासकीय योजनेची योग्य अंमलबजावणी व्हावी व पात्र विद्यार्थिनींना योजनेचा परिपूर्ण लाभ त्या त्या वेळी मिळावा, ही अपीलकर्ता श्री.वाघ यांची भूमिका व त्यासाठी त्यांनी केलेला पाठपुरावा प्रशंसनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेच्या संदर्भातील माहिती केवळ अपीलकर्त्यापुरतीच मर्यादित न ठेवता शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे व समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये स्वयंस्फूर्तीने जाहीर करणे आवश्यक आहे. यानुसार कार्यवाही करून शिक्षण मंडळ प्रमुख, पुणे महानगरपालिका व समाजकल्याण अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांनी दि.५.१२.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

प्रत:समाजकल्याण अधिकारी (गट-अ), पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे पुढील कारवाईसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत गुलाबराव येवले
मु.पो.भोगाव, ता.वाई, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, वाई, ता.वाई, जि.सातारा
**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत,
भोगांव, ता.वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | (३१+५३)/२००८ सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.६.२००९ |
| ३. | **उपस्थित** | |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वाई, ता.वाई, जि.सातारा श्री.सुनिल सिताराम जगताप<br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, भोगांव, ता.वाई, जि.सातारा श्री.शंकर दादु जाधव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.१.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सरपंच व पाच ग्रामपंचायत सदस्य यांनी राजीनामा दिल्याची बातमी वृत्तपत्रात आली, परंतु त्याबाबतची आपण विचारलेली योग्य माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत

भोगाव, ता.वाई, जि.सातारा यांनी दिली नाही. या बातमीबाबत चौकशी होऊन, सत्य जाहीर व्हावे अशी मागणी अपीलकर्ता श्री. चंद्रकांत गुलाबराव येवले यांनी अपील अर्जात व विशेष अपील निर्गत कार्यक्रमातील प्रपत्रात केली आहे.

अपीलकर्ता श्री.चंद्रकांत येवले यांचे वडिल सरपंच होते. त्यांनी राजीनामा दिला, त्याची माहिती अपीलकर्त्यास दिली. अन्य सदस्यांचे राजीनामे अथवा त्याबाबतची कागदपत्रे ग्रामपंचायतीकडे नसल्यामुळे तसे कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत भोगाव, ता.वाई, जि.सातारा यांनी नमूद केले.

श्री.येवले यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली. त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती वाई, ता.वाई, जि.सातारा यांच्याकडे केलेल्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी पुन्हा माहिती नको असल्याचे सांगितले. तसेच वृत्तपत्रात नावे प्रसिध्द झालेल्या पाच सदस्यांनी आपण राजीनामे दिले नसल्याचे दि.२४.२.२००९ रोजी लेखी जबाब दिले आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री.शंकर दादु जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री.सुनिल सिताराम जगताप यांनी संबंधित जबाबांच्या प्रतीसह नमूद केले. या बाबी लक्षात घेता, अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती मथुरा दिनकर शिंदे
मु.पो.पाठखळ, ता.सातारा, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपीक,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१२ / सातारा / २०० |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती मथुरा दिनकर शिंदे
मु.पो.पाठखळ, ता.सातारा, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री.आर.एस.चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपीक,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.ए.एम.भिलावे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१२.२००७ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>दि.६.६.२००७ रोजी तहसीलदार, सातारा यांचेकडील टेनन्सी/फेरचौकशी/एसआर/४/२००७ ही केस अन्य तहसीलदार यांच्याकडे वर्ग करण्याबाबत. |
|---|---|

## विवेचन

वहिवाट प्रकरणातील दावा तहसीलदार, सातारा यांच्याकडून अन्य तहसीलदारांकडे वर्ग करावा यासाठी आपण केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्या श्रीमती मथुरा दिनकर शिंदे यांनी मागितली होती. अर्जानुसार कार्यवाही झालेली नाही, म्हणून चुकीची माहिती दिली व दिशाभूल केली, अशा कारणास्तव श्रीमती मथुरा दिनकर शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण दिलेल्या अर्जानुसार संबंधित प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांच्याकडून काढून घेऊन जिल्ह्यातील अन्य तहसीलदारांकडे वर्ग करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांनी उपविभागीय अधिकारी, सातारा यांना कळविले होते. परंतु उपविभागीय अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर तशी कार्यवाही केली नाही व नंतर दोन महिन्यांनी तहसीलदारांनी आपल्याविरुध्द निकाल दिला, असे प्रतिपादन श्रीमती शिंदे यांनी लेखी व तोंडी केले. मात्र श्रीमती शिंदे यांचा अर्ज संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आला होता. त्याबाबतची माहिती श्रीमती शिंदे यांना देण्यात आलेली होती. कूळकायदा अंतर्गत तहसीलदारांच्या निर्णयाविरुध्द उपविभागीय अधिकारी यांच्याकडे अपील करण्याची तरतूद आहे. श्रीमती शिंदे यांच्या मागणीप्रमाणे तहसीलदारांकडून प्रकरण वर्ग होण्यापूर्वीच निकाल झाला असून उपविभागीय अधिकारी, सातारा यांच्याकडे अपील चालून त्यांनी दि.२४.४.२००८ अन्वये अपील फेटाळले आहे. हा निर्णय श्रीमती शिंदे यांना मान्य नसल्यास त्याविरुध्द अपील करण्याची तरतूद आहे, हे श्रीमती शिंदे यांना स्पष्ट करुन सांगण्यात आले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री.आर.एस.चव्हाण यांनी सागितले. अन्य तहसीलदारांकडे प्रकरण वर्ग करण्याची आपली मागणी

पूर्ण झाली नाही, त्यामुळे आपलयावर अन्याय झाला, आपल्याला न्याय मिळावा, असे प्रतिपादन श्रीमती शिंदे यांनी केले. मात्र हो विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१४.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. धनाजीराव भगवान लवळे
मु.कणसेवाडी, पो.एनकूळ, ता.खटाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, खटाव (वडूज), जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग,
वडूज (खटाव), जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |
| **३.** | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता -** श्री. धनाजीराव भगवान लवळे<br>मु.कणसेवाडी, पो.एनकूळ, ता.खटाव, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, खटाव (वडूज), जि. सातारा श्रीमती आय.व्ही.कोळी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,<br>लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग,<br>वडूज (खटाव), जि. सातारा श्री. मोहन गजानन जाधव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.१.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पाझर तलावापासून शासकीय जागा किती अंतर मीटर असते. तसेच मौजे कणसेवाडी ता.खटाव येथील पाझर तलावाच्या शासकीय जागेमध्ये खाजगी लोकांनी खोदलेल्या विहिर, विंधन विहीरी यांची संबंधितांच्या नावासह तपशीलवार माहिती

## विवेचन

पाझर तलावाच्या शासकीय जागेमध्ये खाजगी लोकांनी खोदलेल्या विहिरी आदींची माहिती अपीलकर्ता श्री. धनाजीराव भगवान लवळे यांनी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, वडूज (खटाव) जि. सातारा यांच्याकडे मागितली होती. संबंधित पाझर तलावापासून खालील बाजूला किती जमीन संपादित केलेली आहे, याबाबत तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, वडूज यांच्याकडून भूमि संपादन नकाशा मागविला असून तो प्राप्त होताच माहिती कळविली जाईल, असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, सातारा यांनी श्री. लवळे यांना कळविले. तसेच जागेला समक्ष भेट देऊन व्यक्तींची नावे व इतर माहिती त्यांनी दिली. परंतु आपल्याला संपूर्ण माहिती मिळाली नाही व चुकीची माहिती दिली, असे प्रतिपादन श्री. लवळे यांनी केले.

तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्याकडून दि.१४.६.२००७ रोजी भूमिसंपादनाचा नकाशा मागविला, तो अद्याप मिळाला नाही. त्यामुळे त्याची प्रत श्री. लवळे यांना देता आली नाही. असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, वडूज (खटाव) जि. सातारा यांनी तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, वडूज यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतींसह नमूद केले.

तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, वडूज यांनी विषयांकित नकाशा अपीलकर्त्यास १५ दिवसांत द्यावा, न दिल्यास ते शास्तीस पात्र राहतील. तसे पत्र जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, वडूज (खटाव) यांनी तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, वडूज यांना द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार नकाशा देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, वडूज (खटाव) सातारा व अपिलीय प्राधिकारी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती वडूज (खटाव), जि. सातारा यांनी व प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता श्री. लवळे यांनी आयोगाने केलेल्या विचारणेनंतर दि. १५.१०.२००९ रोजी आयोगाला अवगत केले. आदेशानुसार अनुपालन अहवाल तत्परतेने सादर करण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. प्रतापसिंह हिंमतसिंह भोसले
मु. पो. पिंपळगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अप्पर जिल्हाधिकारी,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
१) विशेष भूसंपादन अधिकारी क्र १२, कोल्हापूर, जि. कोल्हापूर
२) पुनर्वसन तहसीलदार, कोल्हापूर, जि. कोल्हापूर
३) जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, (कार्यासन क्र. १३), जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१६/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८-१२-२००८ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. प्रतापसिंह हिंमतसिंह भोसले<br>मु. पो. पिंपळगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** पुनर्वसन तहसीलदार, कोल्हापूर, जि. कोल्हापूर<br>श्री. ए. के. मांगले | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५-४-२००७, ७-५-२००७, १४-५-२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०-५-२००७, ३०-४-२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९-८-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - जिल्हाधिकारी (पुनर्वसन) कोल्हापूर यांचेकडील जा. क्र. कार्यासन १५(१०) पुनर्वसन आर/आर/१३०/२००२, दि. २३-१-२००२ च्या आदेशाची नक्कल, माहे डिसेंबर १९९८ रोजी झालेल्या कब्जे पट्टीचे गट नं. ८२७/अ, ब ची नक्कल, दि. २३-१२-२००३ रोजी जिल्हाधिकारी (पुनर्वसन), कोल्हापूर यांनी तहसीलदार, भुदरगड यांना पाठविलेल्या गट नं. ८२७ ब चे जमिनीचा कब्जा न दिल्याबद्दलच्या पत्राची नक्कल, व मुंबई उच्च न्यायालयातील याचिका क्र. २७०९/०३ मध्ये पुनर्वसन अधिकाऱ्यानी दाखल केलेल्या ॲफिडेव्हिटची नक्कल. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रतापसिंह हिंमतसिंह भोसले यांनी जन माहिती अधिकारी तथा विशेष भू संपादन अधिकारी क्र. १२, पुनर्वसन तहसीलदार व कार्यासन अधिकारी क्र १३, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे मध्यम प्रकल्पात जमीन गेल्याने झालेल्या आदेशाच्या नकला मागितल्या होत्या. मागणी करुनही काही नकला मिळत नसल्याने श्री. भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले.

आयोगाने दि. ९-७-२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी  मूळ अभिलेखांचा शोध घेऊन ऊर्वरित नकला देण्यासाठी एक महिन्याची मुदत अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी घेऊनही माहितीबाबत आयोगास अवगत न केल्याने दि. १८-१२-२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्त्यांची मागणी ही जमिनीच्या संपादनाबाबतची आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. तथापि अपीलकर्ता यांच्या मालकीच्या गटात अदलाबदल झालेली आहे. याबाबत मूळ कागदपत्रांच्या अनुषंगाने चौकशी करुन अपीलकर्त्यास योग्य माहिती देण्याचे मौखिक आदेश आयोगाने जनमाहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन तहसीलदार, कोल्हापूर, जि. कोल्हापूर यांनी दिनांक २०-१०-२००९   पर्यंत आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०८-१०-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे-४११ ००१

श्री. शंकर सदाशिव सावळे
रा. तिसंगी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.८.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली श्री. संतोष धनंजयराव जोशी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या घरासमोरील खुल्या जागेबाबत बेकायदेशीपणे अन्य व्यक्तीची नोंद घातली व आपण विविध पातळ्यांवर केलेल्या अर्जांवर योग्य कार्यवाही झाली नाही, त्या संदर्भात नेमकी माहिती दिली गेली नाही,अशी अपीलकर्ता श्री. शंकर सदाशिव सावळे यांची तक्रार आहे.

श्री. सावळे यांनी मिळकत नोंदीसंदर्भात विविध पातळ्यांवर तक्रार केली आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी स्वतः पाहणी करुन अभिप्राय द्यावा, असा ठराव तिसंगी ग्रामपंचायतीने दि. २८.१२.२००१ रोजी केला. अनेक बाबींचा खुलासा व भाष्य

मागणारे प्रश्न श्री. सावळे यांनी विचारले आहेत. त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे, अशी विचारणा करण्यात आली असता ते त्यांनी प्रथम अपिलाच्या वेळीही स्पष्ट केले नाही. त्यांच्या अर्जावर कार्यवाही करण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली श्री. संतोष धनाजीरड्विं जोशी यांनी केले. पंचायतीच्या ठरावाप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी समक्ष पाहणी केली नसल्याचे त्यांनी नमूद केले. या ठरावानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी स्वतः पाहणी करुन एक महिन्यात आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. संतोष धनाजीराव जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रांमपचायत), जिल्हा परिषद, सांगली यांनी दि. २२.९.२००८ रोजी ग्रामपंचायत तिसंगी, ता. कवठेमहांकाळ येथे श्री. सावळे यांच्या मिळकत नोंदीबाबतची चौकशी केली. श्री. सावळे व त्यांचे नातेवाईक यांच्यातील वाद, त्यांचे विविध अर्ज, दिवाणी न्यायालयातील दावा आदींचा तपशील या अहवालात दिला आहे. 'दिवाणी न्यायालयात सदर मिळकतीबाबत चाललेल्या दाव्याचा निकाल लागला असून सदरची मिळकत समाईकात अंगण व दरवाजासह वहीवाटावे असे नमूद केले असल्याचे श्री. सावळे यांनी दि. २२.९.२००८ रोजीच्या भेटीवेळी सांगितले,' असे अहवालात नमूद केले आहे.

उभय बाजूंचे प्रतिपादन लक्षात घेता श्री. सावळे यांची मागणी माहितीची नसून प्रशासकीय कार्यवाहीची आहे व त्याबाबत ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावानुसार प्रत्यक्ष पाहणी आदी कार्यवाही पूर्ण झाली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.१०.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेसाठी अर्ज.

प्रति,
जनमाहिती अधिकारी,
कार्यालयाचे नांव व पत्ता:- उपमुख्य कार्यकारी सो।
ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद सांगली.

१] अर्जदाराचे संपूर्ण नांव:- श्री शंकर सदाशिव सावळे.

२] पत्ता:- रा. तिसंगी ता. कवठे महांकाळ जि. सांगली.

३] हव्या असलेल्या माहितीचा तपशील,
कायदा कशाला म्हणतात व तो कशाबरोबर चालविला जातो.

एक:- माहितीचा विषय :-

१] महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा [ शिस्त व अपील] अधिनियम १९६४ मधील कलम ४ नुसार कारवाई व कारणे दाखवा नोटीस आपण देऊ शकत नाही काय ?

२] मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे उल्लंघन करुन व सरकारी अधिकारी म्हणून कारभार करु शकता काय?

३] आदर्श ह्या वाक्याचा अर्थ काय ?

४] कायद्याचे उल्लंघन करुन नोकरी करणाऱ्या ग्रामसेवकास आपन आदर्श पुरस्कार देऊ शकता काय? व अशी तरतुद कायद्यात आहे काय?

५] दि. २७-३-२००१ रोजी एकाच विषयावरती वेगळे ठराव एकाच ठरावाच्या वेगवेगळ्या प्रती देणारा ग्रामसेवकास आपण पुरस्कार देऊ शकता काय? तो ग्रामसेवक नोकरी करणेस लायक आहे काय?

६] दि. १७-८-२००१ रोजीचे अर्जाविषयी वा स्थायी समिती सभापती यांनी सदर अर्ज स्थायीपुढे ठेवावा म्हणून शिफारस करुन सही केली असता आपणाकडे कोणत्या कायद्याने वर्ग झाला.

७] दि. ३१-७-२००० रोजी ठराव झाला असताना आपण पंचायत समिती कवठे महांकाळ यांना दि. १२-५-२००० चौकशीसाठी पत्र देणे कारण काय?

८] मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४२ मध्ये आदेशाची अंमलबजावणी तहकुब करणे ह्या कलमामध्ये तशी तरतुद आहे काय?
आपण कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे आलेला कोर्ट खर्च व होणारा खर्च व मानसिक त्रास ह्या सर्व बाबीस जबाबदार कोण ?

९] आपण मुद्दाम वाद वाढवून माझे आर्थिक नुकसान करणेचे कारण काय?

१०] आपल्या कार्यालयाकडे रजिस्टर यु.पी.सी. व स्वत:चा पोहोच अर्ज दिले असता आपण कायदेशिर कारवाई का केली नाही. व तसे अधिकार आपणास नाहीत काय?

११] मा. गटविकास अधिकारी यांनी शिफारस केलेला अर्ज ग्रामसेवक स्विकारत

नसैल व मी स्वतः रजिस्टर अर्ज दिला असता तो अर्ज व ग्रामसेवकाने मासिक मिटींगला ठेवला नाही. तरी अधीकारी म्हणून आपण कायदेशीर कारवाई का केली नाही. व आपण कारवाई करु शकत नाही काय?

१२] वरिल प्रश्नाची कायदेशिर उत्तरे दिल्याशिवाय ग्रामपंचायत कर, पाणी पट्टी, एक पैसाही भरणार नाही.

१३] ग्रामपंचायतीने माझे कागदपत्राची अडवणूक केलेस व काही गैर प्रकार घडलेस त्याीव जबाबदारी आपण वरिष्ठ अधिकारी ह्या नात्याने आपणावरती राहिल याची नोंद घ्यावी.

दोन :- ज्या कालावधीसाठी माहिती हवी आहे तो कालावधी दि. २७-२-२००१

तीन:- हव्या असलेल्या माहितीचे वर्णन.

१] दि. २७-२-२००१ रोजी दि. १७-४-२००१ रोजी रजिस्टर पोहोच अर्ज दिले असता व १७-४-२००१ चे अर्जावरती मा. स्थायी सभापती यांनी शिफारस केली असता आपण २७-२-२००१ चा अर्ज चौकशीसाठी का पाठविला त्याचे कारण काय?

चार :- माहिती रजिस्टर पोहोच पोस्टाने पाहिजे आहे.

पाच:- माहिती नोंदणीकृत पोस्टाने हवी आहे.

अर्जासोबत पुराव्यासाठी खालील कागदपत्र जोडणे आहे.

माहितीसाठी ग्रा. विभागाकडुन किती वेळा पत्र व्यवहार केला त्याची यादी देणे.

दि. सन २००१ पासुन मुख्यकार्यकारी ग्रा. पंचायत विभाग तसेच स्थायी समिती रजिस्टर, यु.पी.सी. व ... स्वतःअनेक ... अर्ज दिले आहेत त्याची यादी देणे. पंचायत समिती ... व ग्रामपंचायत तिरसंगी यानाहि दिलेल्या अर्जाची यादी देणे.

ठिकाण - तिरसंगी

दिनांक:- [illegible]

अर्जदाराची सही.

१] २७-२-२००१ स्थायी समिती सभापती अर्ज

२] १७-४-२००१ स्थायी समिती सभापती अर्ज

३] रजिस्टर पावती क्र. ९०७/२७-२ व दि. ९४४/१८-४

४] १-२-२००१ चा ग्रा.प. तिरसंगी व १-७-२००६ बी.डी.ओ. ना दिलेला अर्ज.

५] दि. ०१-३-२००१ सरपंच/ग्रामसेवक अर्ज पोहोच पा.क्र. ९२०/३१३

६] २०-३-२००१ चा मुख्यकार्यकारी यांना रजिस्टर अर्ज

७] २-५-२००० पंचायत समिती चौकशी पत्र